Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. २०/२०१२** **दिनांक ३०.११.२०१२**
**स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सायंकाळी ०५.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शुक्रवार दि.३०.११.२०१२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-३९३६-२०१२, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१२ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शुक्रवार दि.३०.११.२०१२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, सदस्य
०३. श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०८.१०.२०१२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.८८४** दिनांक ०८.१०.२०१२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, ते वाचून कायम करताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या-

**(अ) निर्णय क्र.८०० (०२) मध्ये-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील बांधकामांसाठी आता नव्याने निविदा मागविल्यास प्रकल्पाचे खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच त्यासाठी किमान दोन महिन्यांचा कालावधी लागेल. या बाबी व साईगार्डन प्रकल्पाची तातडी विचारात घेता, ठेकेदार के.आर.आर. इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि., हैद्राबाद यांचे Termination रद्द करुन, वरील बांधकामे पुर्ण करणेसाठी त्यांना तुर्त डिसेंबर, २०१२ अखेरपर्यंत मुदतवाढ देणेत यावी व त्यासाठी ठेकेदार यांचेकडून ते पुर्वीचेच निविदा दरात तसेच करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार वाढीव मुदतीत काम करुन देणार असलेबाबत हमीपत्र घेणेत यावे. डिसेंबर, २०१२ पर्यंतचे वाढीव मुदतीत त्यांच्या कामाची प्रगती पाहुन पुढील योग्य तो निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सभेपुढे सादर करावा, असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईगार्डन व या प्रकल्पासारखे सध्या चालु अथवा प्रलंबीत असलेले इतर सर्व प्रकल्प व त्यासाठीचा खर्च इ.कारणांसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मंजुरी घ्यावयाची असल्याने सदरचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा व मा.खंडपीठाचे मान्यतेनंतर उपरोक्त प्रस्तावाबाबत कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**(ब) निर्णय क्र.८०० (०३) मध्ये-**

साईआश्रम १ व २ विभागासाठी- प्रशासकीय इमारती, रुम बुकींग काऊंटर व पार्किग परिसरसाठी आवश्यक लागणारे दररोजचे मनुष्यबळ व मशिनरी संख्या तसेच इमारतीनुसार मनुष्यबळ व मशिनरी संख्या पुरविणे बाबत अट घालण्यात यावी, त्यानुसार दरमहा देय रक्कमेची विभागणी करुन आकारण्यात यावी, असे चर्चे अंती ठरले. (कार्यवाही- अधिक्षक, साईआश्रम-१ व २)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने सिव्हील ॲप्लीकेशन १२६९४/ २०१२ व १२६९५/ २०१२ पी.आय.एल नं.१८/ २०११ मध्ये दि.२१.११.२०१२ रोजी केलेल्या हुकुमानुसार साईआश्रम भाग- १ व २ कडील सर्व कामे टेक्नीकल एक्सपर्ट यांचेकडून पडताळणी करुन घ्यावयाची असल्यामुळे टेक्नीकल एक्सपर्ट यांची नेमणूक झाल्यानंतर सदरचा प्रस्ताव त्यांचेकडून पडताळणी करुन घेण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, साईआश्रम-१ व २)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.०२ दिनांक ०८.११.२०१२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.८८५ दिनांक ०८.११.२०१२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०३ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता माहे सप्टेंबर, २०१२**

**(ब) माहे ऑक्टोबर- २०१२ मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(A)** माहे सप्टेंबर-२०१२ जमा रु.३८,१२,०२,५९३/- आणि खर्च रु.१३,९८,१०,१४७/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील माहे सप्टेंबर- २०१२ मधील अनुक्रमे रुपये १,५४,२९६/- चा तक्ता, संस्थानची गुंतवणूक दिनांक ३०.०९.२०१२ अखेर रुपये ७,५२,६२,६२,४०८/- चा तक्ता, तसेच दक्षिणा पेटीत जमा झालेले सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या माहे ऑक्टोबर, २०१२ मधील रुपये १४,४६,४२,८३७/- च्या अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८८६ (A) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**०२. श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोबर-२०१२ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**(B)** श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये माहे ऑक्टोबर-२०१२ मधील रुपये ३९,१७,२४५/- मात्र देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८८६ (B) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०३. श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोबर- २०१२ मध्ये गरीब रुग्णांना बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

**(C)** साईनाथ रुग्णालयात ऑक्टोबर- २०१२ मधील अंतररुग्ण व बाह्यरुग्ण साठी रुपये ४,२२,३५८/-, थॅलेसेमिया व हिमोफेलिया रुग्णांसाठी रुपये ६७,०५०/- मात्र रकमेची वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८८६ (C) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०४. श्री साईबाबा रुग्णालयात माहे सप्टेंबर, ऑक्टोबर- २०१२ मध्ये गरीब रुग्णांना वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

**(D)** श्री साईबाबा रुग्णालयात माहे सप्टेंबर व ऑक्टोबर-२०१२ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये अनुक्रमे रुपये २८,६३,२८२/- व रुपये-३९,३८,२५५/- मात्र याप्रमाणे देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८८६ (D) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०५. माहे ऑक्टोबर- २०१२ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**(E)** माहे ऑक्टोबर-२०१२ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर ऑक्टोबर-२०१२ मध्ये- ५०,२०२ मनुष्य दिनांच्या कर्मचाऱ्यांच्या/ कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८८६ (E) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.०४ गहु आटा खरेदी करणेसाठी चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१२ - १३ (नोव्हें.-१२ ते मार्च-१३) साठी प्रसादालय, मंदिर व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल व निविदा मागवून खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०८.२०१२ रोजी झालेल्या त्रिसदस्य सभेमध्ये मान्यता दिली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१६.१०.२०१२ रोजी उपरोक्त कार्यवाहीस मान्यता देण्यात आली. त्यानुसार दि.२१-२२.१०.२०१२ रोजीचे वर्तमानपत्रात निविदा विक्रीबाबत जाहिरात प्रसिद्ध करुन दि.२२.१०.२०१२ ते दि.३१.१०.२०१२ अखेर निविदा विक्री करणेत येऊन दि.०१.११.१२ अशी निविदा व नमुने स्विकारणेची अंतिम मुदत ठेवणेत आलेली होती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



निविदेमध्ये ९००० क्विंटल सम्राट, कॅप्टनकुक, शक्तीभोग, अन्नपुर्णा कंपनीचा गहु आटा खरेदीकामी ६ निविदाधारकांचे ७ नमुने प्राप्त झाले होते. पैकी मा.त्रीसदस्य समितीने सुचविलेनुसार तज्ञ समितीने दि.०३.११.२०१२ रोजी सुयोग्य नमूने निवडले त्यामध्ये गहु आटा खरेदीकामी खालील निविदाधारकांचे नमुने निवडण्यात आले.

१. मे.डी.जे.अॅण्ड सन्स, पुणे - सम्राट ब्रॅण्ड
२. मे.आर.मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद - सम्राट ब्रॅण्ड
३. मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड - सम्राट ब्रॅण्ड
४. मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड - सम्राट ब्रॅण्ड

निवडक नमुन्याच्या निविदाधारकांना दि.१२.११.२०१२ रोजीचे मा.त्रीसदस्य समिती सभेपुढे चर्चा वाटाघाटीसाठी आमंत्रित करण्यात आले होते. सदर सभेत लिफाफा क्र.१ (मुळ निविदा) उघडण्यात येऊन त्यांना दरांबाबत चर्चा वाटाघाटीसाठी एकत्र उपस्थित करण्यात आले होते. उपरोक्त चारही निविदाधारकांनी निविदेत दिलेला दर व चर्चा वाटाघाटीमध्ये दिलेल्या दरांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | निवडलेल्या नमुन्याधारकांचे नांव | जात/ प्रकार | मुळ दर प्रति क्विंटल व्हॅटसह | वाटाघाटी नंतरचे दर प्रति क्विंटल व्हॅटसह |
|---|---|---|---|---|
| **१** | **गहु आटा (अन्नपुर्णा/शक्तीभोग/सम्राट/कॅप्टन कुक) मागणी ९००० क्विंटल** | | | |
| १ | मे.डी.जे.अॅण्ड सन्स, पुणे | सम्राट | २,२०० | २,१५१ |
| २ | मे.आर.मुथ्था राईस हाऊस, औं.बाद | सम्राट | २,११५ | २,०५२ |
| ३ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक रोड | सम्राट | २,१५० | २,०९० |
| ४ | मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड | सम्राट | २,२०१ | **२,०१०** |

वरीलप्रमाणे चर्चा वाटाघाटीमध्ये हिरालाला चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचे सम्राट कंपनीचे गहु आट्याचे प्रति क्विंटल (व्हॅटसह) दर रु.२,०१०/- (अक्षरी रुपये दोन हजार दहा) न्युनतम असल्याने मान्य करण्यात आले, व त्यांना इकडील जा.क्र.एसएसएस/वशी/खरेदी-प्रसाद/३७३०/२०१२ दि.१९.११.२०१२ नुसार पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी त्यांचे दि.२२.११.२०१२ रोजीचे पत्रामध्ये संस्थानकडील जा.क्र.एसएसएस/वशी/खरेदी-प्रसाद/३७३०/२०१२ दि.१९.११.२०१२ नुसार पुरवठा आदेश प्राप्त झाला आहे. तथापी पुरवठा आदेशातील सम्राट ब्रॅण्ड गहु आटा मिल मालक देण्यास तयार नसल्याने सम्राट ब्रॅण्डचा गहु आटा पुरवठा करण्यास अडचण निर्माण होत असल्याने आम्ही सम्राट ब्रॅण्डचा गहु आट्याचा पुरवठा करु शकत नाही. आपल्या टेंडर फॉर्ममध्ये ४ प्रकारचे गहु आट्याची मागणी केली होती, त्यातील कॅप्टन कुक ब्रॅण्डचा गहु आटा हा बेस्ट क्वॉलिटीचा मी त्याच दरात प्रति क्विंटल रु.२,०१०/- प्रमाणे पुरवठा करण्यास तयार आहे. तरी माझ्या अर्जाचा सकारात्मक विचार करावा, अशी विनंती केलेली आहे.

प्रसादालय माल निवड समितीने सम्राट गहु आट्याची निवड केली असल्याने त्यासाठीच चर्चा वाटाघाटी झाली असल्याने मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी संदर्भीय पत्रात नमुद केल्याप्रमाणे त्यांचेकडून सम्राटऐवजी कॅप्टन कुक गहु आटा घेता येणार नाही.

प्रसादालयामध्ये शुक्रवार, दि.२३.११.२०१२ अखेर १६० क्विंटल गहु आटा शिल्लक आहे. दररोज अंदाजे ४० ते ५० क्विंटल गहु आटयाची आवश्यकता आहे. सदरचा साठा प्रसादालयात अंदाजे दोन ते तीन दिवस (शनिवार ते सोमवार अखेर) पुरेल असे अधिक्षक प्रसादालय यांनी सांगितले आहे. त्यामुळे आटा नसल्याने पुढे साईभक्तांना प्रसादभोजनात चपाती देणे अडचणीचे होईल.

तरी मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी मालाचा पुरवठा न केल्याने जादा होणारी फरकाची रक्कम त्यांचे सुरक्षा अनामत रकमेतुन वसुल करणेस व करारनाम्यातील अटी/ शर्तीनुसार त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करणेबाबत निर्णय होणेस व निवड समितीने निवडलेल्या सम्राट आट्याच्या उर्वरीत तीन निविदाधारकांशी मा.व्यवस्थापन समिती (त्रीसदस्य) पुढे समक्ष चर्चा वाटाघाटी करुन गहु आटा खरेदीबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८८७** **प्रसादालयासाठी सम्राट ब्रॅण्ड गहु आटा पुरविणारे न्युनतम दरधारक मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी सभेला सांगितले की, सम्राट बॅंड गहु आटा मिलचे मालक त्यांना सम्राट ब्रॅण्डचा गहु आटा देणेस तयार नाहीत, त्यामुळे ते संस्थानला गहु आटा पुरवठा करु शकत नाहीत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सम्राट ब्रॅण्डचा गहु आटा पुरवठा करणेसाठी द्वितीय निम्नतम दरधारक मे.आर.मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद यांना, त्यांनी चर्चेअंती देऊ केलेल्या रु.२,०५२/- प्रति क्विंटल (व्हॅटसह) या दराने संस्थान प्रसादालयासाठी सम्राट ब्रॅण्ड गहु आटा पुरवठा करणेसाठी कार्यादेश देणेत यावा. सदरची जादा दराने खरेदी केल्यामुळे दरातील फरकाची रक्कम न्युनतम दरधारक मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचेकडून वसुल**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**करणेत यावी. मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी पुरवठा आदेशानुसार सम्राट ब्रॅण्डचा गहु आटा पुरवठा न केल्यामुळे त्यांची गहु आटयासाठी असलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत यावी व त्यांना ३ वर्षासाठी संस्थानसाठी गहु आटा पुरवठा करण्यासंबंधी खरेदी प्रक्रियेत सहभाग घेता येणार नाही.**

**तसेच, श्री साईप्रसादालयासाठी तातडीची गरज म्हणुन तात्पुरत्या स्वरुपात किमान १५ दिवस पुरेल अशा प्रमाणात महाबीज अथवा जवळच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमधुन गहु खरेदी करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.०५** **गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे डिसेंबर, २०१२ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे: -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | बँक ऑफ बरोडा, नासिक | २/१२/२०१२ | ५,५०,७२,२८२/- |
| २) | आंध्र बँक, शिर्डी ( NPAY ) | ४/१२/२०१२ | ४७,५७,३९२/- |
| ३) | बँक ऑफ बरोडा, नासिक | ६/१२/२०१२ | ७,२२,२४,०७८/- |
| ४) | बँक ऑफ बरोडा, नासिक | ७/१२/२०१२ | १,२०,३७,३४६/- |
| ५) | आंध्र बँक, शिर्डी ( NPAY ) | ७/१२/२०१२ | ४०,८२,६२५/- |
| ६) | बँक ऑफ बरोडा, नासिक | १५/१२/२०१२ | ४,४०,८७,९३८/- |
| ७) | विजया बँक, शिर्डी | १५/१२/२०१२ | १,१७,८७,५३७/- |
| ८) | विजया बँक, शिर्डी | १६/१२/२०१२ | १,१७,८९,८७८/- |
| ९) | विजया बँक, शिर्डी | १७/१२/२०१२ | १,१७,९२,२१९/- |
| १०) | विजया बँक, शिर्डी | १८/१२/२०१२ | १,१७,९४,५६०/- |
| ११) | विजया बँक, शिर्डी | १९/१२/२०१२ | १,१७,९६,९०१/- |
| १२) | विजया बँक, शिर्डी | २०/१२/२०१२ | १,१७,९९,२४२/- |
| १३) | बँक ऑफ बरोडा, नासिक | २०/१२/२०१२ | ६,०६,१७,६३४/- |
| १४) | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | २०/१२/२०१२ | ३,००,००,०००/- |
| १५) | विजया बँक, शिर्डी | २१/१२/२०१२ | ६,२१,१३६/- |
| १६) | बँक ऑफ बरोडा, नासिक | २४/१२/२०१२ | ९,१०,११,२६९/- |
| १७) | बँक ऑफ बरोडा, नासिक | ३०/१२/२०१२ | २,७५,७६,४८२/- |
| १८) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ३०/१२/२०१२ | २,७५,७६,४८२/- |
| १९) | युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ३१/१२/२०१२ | ३,७२,१६,४१०/- |
| २०) | युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ३१/१२/२०१२ | ४,६५,२०,५१२/- |
| २१) | दैनंदिन खर्च वजा जाता माहे डिसेंबर २०१२ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | | एकूण रक्कम - | ६८,४१,६१,९२३/- |

वरील तपशीलानुसार साधारणत: रक्कम रु. ६८.४१ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

तथापि अ.नं. २ व ५ आंध्र बँक, शिर्डी यांचेकडील नित्यप्रसादालय अन्नदान योजनेतील रक्कम ही सदर योजनेतील तरतुदीनुसार त्यांचेकडेच गुंतवावी लागणार आहे. त्यामुळे सदरची रक्कम वजा जाता उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१ ) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
८) युको बँक, शिर्डी
९) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



१०) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
११) विजया बँक, शिर्डी
१२) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १२ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु. ६८.४१ कोटीची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी मा.त्रिसदस्य समितीच्या सभेत मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.८८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १२ या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु. ६८.४१ मात्र कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.०६** **सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी कर विषयक सर्व कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेल्या लेखापरिक्षक यांना लेखापरिक्षण फी आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी करविषयक सर्व कामकाजाचे लेखापरिक्षण करणेकामी श्री. शंकर अनदानी, चार्टर्ड अकौंटंट्स, अहमदनगर यांची मा.व्यवस्थापन समितीने मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.७८ अन्वये नेमणुक करण्यात आली होती.

त्यास अनुसरुन जा.क्र.एसएसएस/ वशी-अंलेप/ ८३४/ २०११, दि.०९.०५.२०११ रोजीच्या कार्यादेशान्वये श्री शंकर अनदानी, चार्टर्ड अकौंटंट्स, अहमदनगर यांची वार्षिक रु.१,७५,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पंच्याहत्तर हजार मात्र) या मानधनावर नियुक्तीचे पत्र देण्यात आले होते. अद्यापपावेतो कर सल्लागार श्री.शंकर अनदानी यांना प्रतिमहा रु.१२,५००/- प्रमाणे रु.१,५०,०००/- देण्यात आलेले आहेत.

सन २०११-१२ व २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये श्री अनदानी यांनी आदेशातील क्र.०४ मधील अटीनुसार एक पुर्णवेळ प्रतिनिधी संस्थान कामकाजासाठी शिर्डी येथे देणे बंधनकारक होते. त्याप्रमाणे त्यांनी प्रतिनिधी उपलब्ध करुन दिला होता. सदर प्रतिनिधीस साईप्रसाद निवासस्थान रुम क्र. ५७ देण्यात आलेली होती. साईप्रसाद निवासस्थान विभागप्रमुख यांनी डि.पी. क्र. १७४७ दि.०८.०८.२०१२ नुसार दि.०७.०५.२०११ ते दि.०८.०८.२०१२ (सन २०११-१२ व २०१२-१३ चे) अखेर रु.६८,८५०/- ( अक्षरी रुपये अडूसष्ट हजार आठशे पन्नास मात्र) खोली भाड्यापोटी थकबाकी वसुल करणेचे कळविले आहे. परंतु लेखापरिक्षणाचे कामकाजासाठी कर सल्लागार प्रतिनीधी यांना खोली दिलेली असल्यामुळे व मागील सन २०११-१२ व चालू २०१२-१३ या वर्षाची निवासव्यवस्थेची वसुली न करता ती माफ करणेस मान्यता मिळणेकामी मा.त्रीसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.८८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.०७** **लेखाशाखेत प्राप्त देयकांच्या पुन:मंजुरीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या विविध विभागातुन देयेक आदा करण्यासाठी लेखाशाखेत प्रस्तावित करण्यात येतात. यापैकी दिनांक २८ नोव्हेंबर २०१२ अखेर प्रलंबित असलेल्या देयकांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | विभाग | पुरवठादाराचे नाव | तपशिल | देय रक्कम | मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | विदयुत विभाग | मे.ओंकार इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि., पुणे | साईप्रसादालयात किचनमध्ये वायुविजन यंत्रणा व एक्झॉस्ट यंत्रणा CAMC बाबत. (मंजुर रक्कम रु ४७,३५,१४=००) | १,१८,३७९.०० | ४६३<br>१४-०७-२०१२ |
| २ | आय.टी. विभाग | कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे. | माहे ऑगस्ट व सप्टेंबरचे टेक्नीकल सव्हिसेसचे बील (मंजुर रक्कम रु २० कोटी, ४० लाख मात्र) | ५४,७०,७६२.०० | ७९९<br>०७/११/२००९ |

तरी उपरोक्त देयकांची रक्कम पुरवठादारांना आदा होणेकामी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं. १ ची देयके आदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच अ.नं. २ चे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे करारनाम्यातील तरतुदीनुसार त्यांचे मासिक सर्व्हिस फींची रक्कम मुदतीमध्ये आदा करणे आवश्यक आहे, असे शिर्डी साई ट्रस्टचे व्यवस्थापकीय विश्वस्त श्री.के.व्ही. रमनी यांनी त्यांचे दि.२९.११.२०१२ रोजीचे पत्राने**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**कळविलेले आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे मासिक सर्व्हिस फींची रक्कम आदा करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.०८** **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव (दसरा) सन २०१२ करिता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणीसाठी केलेल्या कार्यवाहीबाबत.**

**निर्णय क्र.८९१** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०९** **साईआश्रम १ व २ करिता आवश्यक फर्निचर खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.८९२** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक-खरेदी विभाग)

---

**विषय नं.१०** **श्री साईनाथ रुग्णालय नेत्र विभागातील शस्त्रक्रियांच्या दरात वाढ करणेबाबत.**

**निर्णय क्र.८९३** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.११** **व्हेंटीलेटर मशिनचे दुरुस्तीबाबत.**

**निर्णय क्र.८९४** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता ३ नेटवर्क स्विच खरेदीकामी रु.९०,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८९५** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१३** **श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ओ.टी.विभागाकरीता वॉशिंग मशिन खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.८९६** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१४** **सन २०११-१२ मधील वार्षीक खरेदीमधील मंजुर दराने औषधे, सर्जिकल व कन्झुमेबल साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.८९७** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१५** **जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत प्रलंबीत अनुदान रकमेबाबत.**

**निर्णय क्र.८९८** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१६** **जादा वैद्यकिय बीलाचा परतावा आदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८९९** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१७** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Leyla Retractor खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.९००** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१८** **श्री साईबाबा रुग्णालयाकरीता Air Curtain व U.V. Sterilizer खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.९०१** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१९** **श्री साईबाबा रुग्णालयातील CRU-III या विभागाकरीता Syringe Pump खरेदी व जुने Infusion Pump Buyback करणेबाबत.**

**निर्णय क्र.९०२** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२०** **डॉ.काशिनाथ नरसोबा टिंगरे, व्हिजीटींग न्युरो सर्जन, श्री साईबाबा हॉस्पीटल यांचा मुदतवाढ मिळणेबाबत दि.०२.१०.२०१२ रोजीचा अर्ज.**

**निर्णय क्र.९०३** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२१** **डॉ.सुजय आर.विखे पाटील, लोणी यांचा श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये न्युरो सर्जन म्हणून मोफत व्हिजीट देणेस परवानगी मिळणेबाबतचा दि.२२.११.२०१२ रोजीचा अर्ज.**

**निर्णय क्र.९०४** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२२** **माहे सप्टेंबर- २०१२ महिन्यात मासिक वेतनाव्यतिरिक्त ४० डॉक्टरांना रु.८५,२९,२६७/- मात्र इनसेन्टीव्ह आदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.त्रिसदस्य समितीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी चा कार्यभार स्वीकारल्यानंतर मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद याचे समोरील पिआयएल नं.१८/२०११ मध्ये दि. १३.०३.२०१२ रोजी खालील आशयाचा आदेश झालेला आहे. Clause No. १८ - "The

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



existing committee and the committee constituted by this court is directed not to take any major financial decision in respect of management of the affairs of the Sansthan without intimating this Court." सदर आदेशास अनुसरुन मोठया स्वरुपाचे आर्थिक व्यवहार मा.उच्च न्यायालयाच्या परवानगी/मान्यतेशिवाय करता येणार नाही असे परिपत्रक पारीत करण्यात आले आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल दि.१५.०५.२००६ पासुन सुरु झाले आहे. सुरुवातीस हॉस्पिटलपुर्ण क्षमतेने चालण्यासाठी कमीत कमी दर आकारणी व डॉक्टरांना मिळणारी रक्कम कमी असेल तर चांगले डॉक्टर मिळणारी नाही. म्हणून डॉक्टरांना मासिक वेतन/मानधन अधिक कामाचे प्रमाणात काही प्रमाणात जास्त टक्केवारीने मोबदला (इन्सेंन्टीव्ह) देण्याचे धोरण अंवलबून दरपत्रक तयार करण्यात आले होते. या दरपत्रकात मा.व्य.समिती निर्णय क्रं.७७०/२२.०९.२००७ व निर्णय क्रं.१९६/०८.०३.२००९ अन्वये सुधारणा करण्यात येऊन त्यामध्ये नमूद केलेल्या विशिष्ट दरांनुसार डॉक्टरांना दरमहा केलेल्या कामाच्या विशिष्ट प्रमाणात इन्सेंन्टींव्ह देण्यात येत आहे. आर्थिक वर्ष २००६-०७ पासून रुग्णांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. जिवनदायी आरोग्य योजने अंतर्गत दरमहा साधारणत: ४ ते ४.५० कोटी रकमेच्या शस्त्रक्रिया होत आहे त्यामुळे डॉक्टरांना सुरुवातीच्या काळात मिळत असलेल्या इन्सेंन्टींव्हच्या तुलनेत सध्या मोठया प्रमाणावर इन्सेंन्टींव्ह मिळत आहे. माहे सप्टेंबर २०११ या महिन्यात ४० डॉक्टरांना मासिक वेतनाव्यतिरीक्त रु.८५,२९,२६७/- इन्सेंन्टींव्ह देय होत आहे. सदर इन्सेंन्टींव्ह देण्यासाठी पुनर्मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.त्रिसस्य समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.९०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मासिक पगार किंवा इन्सेन्टीव्ह यासाठी मा.खंडपीठाची परवानगी घेण्याची आवश्यकता नसल्याने श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टर्स यांना थकित असलेली इन्सेन्टीव्हची रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, संस्थानच्या सर्व डॉक्टरांबरोबर चर्चा करुन त्यांना फिक्स इन्सेन्टीव्ह ठरविणेबाबत स्वतंत्ररित्या व्यवस्थापन समिती सभेचे आयोजन करणेत यावे, तत्पुर्वी इतर ठिकाणच्या ०५ नामांकित हॉस्पिटलकडून इन्सेन्टीव्हबाबत माहिती प्राप्त करुन घेणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२३** **सी.व्ही.टी.एस. ओ.टी. या ऑपरेशन थिएटर विभागाकरीता फ्लॅप गाऊन खरेदीबाबत.**
**निर्णय क्र.९०६** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२४** **श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा रजिष्टरमधून निर्लेखित करणेबाबत.**
**निर्णय क्र.९०७** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२५** **ब्लड बँक विभागातील विविध मशिन्सचे कॅलीब्रेशन करणेबाबत.**
**निर्णय क्र.९०८** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२६** **रुग्णालयांतील वैद्यकिय अधिकारी यांना ३५% व्यवसायरोध भत्ता (एन.पी.ए.) लागू करणेबाबत.**
**निर्णय क्र.९०९** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२७** **श्री साईनाथ रुग्णालय विभागास नवीन झेरॉक्स मशिन खरेदी करणेबाबत.**
**निर्णय क्र.९१०** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२८** **११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करण्यात आलेल्या श्रीमती संगिता शामराव पवार (हिस्टोपॅथ टेक्निशियन) यांची नेमणूक संपुष्टात येत असलेबाबत व त्यांचा दि.१९.१०.२०१२ रोजीचा संस्थान सेवेत कायम करणेबाबतचा अर्ज.**
**निर्णय क्र.९११** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२९** **२.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत.**
**निर्णय क्र.९१२** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३०** **Capacitor खरेदी करणेबाबत.**
**निर्णय क्र.९१३** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.३१** **वाहन विभागात स्टोअरकरीता शेड तयार करणेबाबत.**
**निर्णय क्र.९१४** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३२** **साईआश्रम भाग- ०१ करिता हायमास्ट लॅम्प खरेदी करुन बसविणेबाबत.**
**निर्णय क्र.९१५** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३३** **मे.शापुरजी पालोनजी ॲण्ड कंपनी, नाशिक यांचे विद्युतीकरण कामाचे खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**
**निर्णय क्र.९१६** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३४** **श्री साई प्रसादालयाकडील सबस्टेशनचा कॉन्ट्रॅक्ट डिमांड (विद्युत भार) वाढवून घेणेबाबतचे चार्जेस भरणेबाबत.**
**निर्णय क्र.९१७** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३५** **साईआश्रम भाग- १ कडील ए.सी. सिस्टीमसाठी लागणाऱ्या नवीन सबस्टेशनकरीता वीज जोडणीचे चार्जेस भरणेबाबत.**
**निर्णय क्र.९१८** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३६** **रोखीने अथवा वस्तुरुपाने रुपये ५०००/- किंवा त्यापेक्षा जास्त देणगी देणाऱ्या भक्तांना संस्थानमार्फत श्री साईबाबांचा पॉकेट साईज, कृष्णधवल, दगडावर बसलेले बाबा थ्रीडी फोटो विनामुल्य भेट देणेकामी झालेला खर्च Publication Expenses खाते नांवे होणेबाबत**
**निर्णय क्र.९१९** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक- प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३७** **मे.अजय ऑफसेट प्रा.लि., पुणे यांचे नांव प्रकाशने विभागाकडील प्रेसधारकांचे निवडक यादीतून कमी करणेस मान्यतेबाबत.**
**निर्णय क्र.९२०** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक- प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३८** **संस्थान निर्मित साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्हीसीडी व ग्लीम्पसेस ऑफ श्री साईबाबा डीव्हीडी निर्मिती कामाचे खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**
**निर्णय क्र.९२१** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक- प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३९** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे मान्यवरांना श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका-२०१३ विनामुल्य भेट देणेबाबत.**
**निर्णय क्र.९२२** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक- प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४०** **श्री साई चरित अनुगायन प्रकाशित करणेबाबत.**
**निर्णय क्र.९२३** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक- प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४१** **नवीन प्रेसधारकांचे नाव निवडक प्रेसधारकांचे यादीत समाविष्ट करुन घेणेबाबत.**
**निर्णय क्र.९२४** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक- प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४२** **श्री दत्त जयंती- २०१२ या निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करणेबाबत.**
**निर्णय क्र.९२५** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४३** **संस्थानकरिता ई-टेंडर प्रक्रिया mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सुरु करणेबाबत.**
**निर्णय क्र.९२६** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४४** **Setup Box (डिश) वरील श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधेबाबत.**
**निर्णय क्र.९२७** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४५** **न्युज एक्सप्रेस, नोएडा या चॅनेलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करणेबाबत.**
**निर्णय क्र.९२८** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.४६** **श्रींचे दर्शनहॉल क्र.०१ ते ०४ व मंदिर परिसरात महत्वाचे ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत.**
**निर्णय क्र.९२९** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४७** **द्वारावती भक्तनिवासमधील नवीन जनसंपर्क कार्यालयाच्या फर्निचरबाबत.**
**निर्णय क्र.९३०** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-जनसंपर्क विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४८** **साईआश्रम- १ व २ च्या एकुण १८ इमारतीचे मागील बाजुस LED (निऑन इफेक्ट) ग्लोसाईन बोर्ड बसविणेबाबत.**
**निर्णय क्र.९३१** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,साईआश्रम १ व २)

---

**विषय नं.४९** **डेडस्टॉक वस्तुंवर संगणक कोड नंबर स्टिकर पेन्टींगचे कामाबाबत.**
**निर्णय क्र.९३२** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,साईआश्रम १ व २)

---

**विषय नं.५०** **जमा होणाऱ्या सेवाआकार रकमेच्या सुरक्षीततेसाठी दोन लोखंडी तिजोरी खरेदी विभागामार्फत खरेदी करणेबाबत.**
**निर्णय क्र.९३३** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,साईआश्रम १ व २)

---

**विषय नं.५१** **साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील सोलर वॉटर हिटींग सिस्टीमव्दारे गरमपाणी वाटप मुदतवाढीबाबत.**
**निर्णय क्र.९३४** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.५२** **पेस्ट कंट्रोल एम वॉल्श, मुंबई यांचे करारनाम्याबाबत.**
**निर्णय क्र.९३५** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.५३** **श्री साईबाबा औ.प्र.संस्थेतील मशिनिष्ट ग्राईंडर या व्यवसायातील लेथ मशिनचा पार्ट नविन बनविणेबाबत.**
**निर्णय क्र.९३६** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय.)

---

**विषय नं.५४** **श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांचे आठ प्रशिक्षणार्थी ४९ व्या राज्य कौशल्य स्पर्धा परीक्षेसाठी पात्र ठरलेबाबत.**
**निर्णय क्र.९३७** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय.)

---

**विषय नं.५५** **शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ज्युनिअर केजी वर्गाचे विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेबाबत.**
**निर्णय क्र.९३८** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्या,इग्लिश मिडीअम स्कुल)

---

**विषय नं.५६** **वंचीत व दुर्बल घटकांतील बालकांना मोफत प्रवेश देणेबाबत.**
**निर्णय क्र.९३९** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्या,इग्लिश मिडीअम स्कुल)

---

**विषय नं.५७** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल शाळा दोन सत्रात भरविणेबाबत.**
**निर्णय क्र.९४०** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्या,इग्लिश मिडीअम स्कुल)

---

**विषय नं.५८** **नविन भक्तनिवासस्थान येथील लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दिलेल्या गाळयांबाबत.**
**निर्णय क्र.९४१** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.५९** **साईप्रसाद परिसरातील गाळे / स्टॉल्स संस्थान वापरांत घेणेबाबत.**
**निर्णय क्र.९४२** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.६०** **स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील जागेबाबत.**
**निर्णय क्र.९४३** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.६१ स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील ए.टी.एम. चे जागेस मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.९४४ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.६२ प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडे पट्ट्याने देण्यात आलेल्या सर्व्हे नं.१४८ मधील ११४.३२ चौ.मी. बांधीव व २६६.२८ चौ.मी. मोकळया जागेस मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९४५ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.६३ संस्थान परिसरात चालवित असलेल्या स्नानगृहे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.९४६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.६४ मौजे निमगाव कोऱ्हाळे ग्रामपंचायतीची इमारत कराची चालू बाकी भरणेबाबत.**

**निर्णय क्र.९४७ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.६५ श्री विरभद्र बिरोबा बन येथील श्री विरभद्र यात्रेतील कुस्त्यांच्या हंगामाकरिता करणेत आलेल्या आर्थिक मदतीची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.हरी हेमा बनकर, विरभद्र दल,बिरोबा-बन, शिर्डी ( बिरेगांव बन ) यांनी त्यांचे दिनांक २५/१०/२०१२ रोजीचे अर्जात विरभद्र ( बिरोबा) या दैवताची यात्रा हि २६/११/२०१२ ते २८/११/२०१२ अखेर बिरोबा बन, शिर्डी येथे मोठया थाटात भरणार असून यात दि.२८/११/२०१२ रोजी कुस्ती हंगामही आयोजित केलेला आहे. या कुस्त्यात भाग घेणाऱ्या व विजयी पहिलवानांना वाटण्यासाठी म्हणून मागील वर्षी रु.७५,०००/- रक्कम मिळाली होती. तरी यावर्षीही रु.१,००,०००/- ची आर्थिक मदत मिळावी अशी विनंती केलेली आहे.

दि.१७/११/२००४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.११९ नुसार एक विशेष बाब म्हणून विरभद्र यात्रा बन, शिर्डी यांना दि.२६/११/२००४ रोजी होणाऱ्या कुत्स्त्यांच्या हगाम्यासाठी रु.२५ हजार रक्कम श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे संस्थान प्रतिनिधी नेमून देण्यात यावी, असे ठरल्याप्रमाणे रक्कम देणेत आली होती. तसेच त्यानंतर दरवर्षी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार खालीलप्रमाणे रक्कम मंजूर करुन वाटणेत आलेली आहे.

| अ.नं. | सभेची तारीख व निर्णय क्र. | मंजूर रक्कम | प्रत्येक्ष खर्च |
|---|---|---|---|
| १ | दि.१७/११/२००४, निर्णय क्र.११९ | २५,०००-०० | २४,४९९-०० |
| २ | दि.५/११/२००५, निर्णय क्र. ७१२ | ५०,०००-०० | ४८,१५२-०० |
| ३ | दि. १४/१०/२००६ निर्णय क्र.८६६ | ५०,०००-०० | ४३,५३३.०० |
| ४ | दि.१८/११/२००७ निर्णय क्र.७८२ | ५०,०००-०० | ४९,०२०.०० |
| ५ | दि.३/१/२००८ निर्णय क्र.०४(१९) | ७५,०००-०० | ६४,०८०-०० |
| ६ | दि.७/११/२००९ निर्णय क्र.८६७ | ७५,०००-०० | ६९,५७०-०० |
| ७ | दि.२१/१०/२०१० निर्णय क्र.९२३ | ७५,०००-०० | ७२,०८०-०० |
| ८ | दि.१४/१/२०१२ निर्णय क्र.१३१ | ७५,०००-०० | ७०,२७०-०० |

दिनांक १४/१/२०१२ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१३१ नुसार मागील वर्षी सदरकामी रु.७५,०००/- मात्रची आर्थिक मदत संस्थानमार्फत देण्यात आली होती. त्यापैकी रु.७०,२७०/- इतकी रक्कम बिदागी म्हणून वाटली असून उर्वरीत रक्कम लेखाशाखेत जमा-नांवे करण्यात आलेली होती.

चालू वर्षी गेल्या वर्षाप्रमाणे रुपये ७५,०००/- मंजुर करुन श्री रामनवमी उत्सवातील प्रथेप्रमाणे संस्थानचा प्रतिनिधी (लेखाशाखेतील कर्मचारी) नियुक्त करुन विजयी पहिलवांनाना बिदागी म्हणून रक्कम वाटून ऊर्वरीत रक्कम लेखाशाखेत जमा नावे करण्यात येईल.

मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.६६ श्री साई सत्च्चरित पारायण- २०१२ खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.९४९ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.६७ कंत्राटी पध्दतीने सेवेची मुदतवाढ मिळणेबाबत श्री.रमेश शांताराम साबळे, विशेष कार्य अधिकारी यांचा दि.१४.११.२०१२ चा अर्ज.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.९५० सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग)

---

**विषय नं.६८ फायर ॲण्ड सेफ्टी अधिकारी (कंत्राटी) पद जाहीरातीद्वारे भरणेबाबत.**

**निर्णय क्र.९५१ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.९५२** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**(१)** मे.पंचामृत डेअरी, मुंबई हे पुरवठा करत असलेले गावरान तुप कढईत ओतल्यानंतर फेस येतो, धुर येतो व लाडुची चव कडवट येते असे दिसुन आल्याने पंचामृत डेअरी, मुंबई यांचे प्रतिनीधी श्री.एस.आर. मिश्रा यांना आजचे सभेपुढे हजर राहणेबाबत तोंडी कळविलेले होते. त्यानुसार ते उपस्थित होते. सभेत श्री.मिश्रा यांचे समवेत चर्चा होऊन, त्यांना शिर्डी येथे बोलावून त्यांचेसमोर पंचामृत डेअरी प्रॉडक्टचे तुपापासुन प्रसाद लाडु बनविण्याची सर्व प्रक्रिया करण्यात यावी व या सर्व प्रक्रियेचे व्हिडीओ शुटींग करणेत यावे. तसेच सदर तुपाचा नमुना लॅब तपासणीसाठी पाठविण्यात आलेला आहे. सदरचा तपासणी रिपोर्ट आल्यानंतर सदर प्रकरणी सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत यावा. तोपर्यंत पंचामृत डेअरी, मुंबई यांचा पुरवठा व वापर थांबविणेत यावा. (कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय/ खरेदी विभाग)

**(२)** भारत राईस ॲण्ड ऑईल मिल, हैद्राबाद हे पुरवठा करत असलेले विशालड्रॉप ब्रॅण्डचे सुर्यफुल तेल लॅबमध्ये तपासणी करणेसाठी पाठविले असता, लॅब तपासणी अहवालानुसार सदरचे तेल, सुर्यफुल तेल नाही, असे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे सदरचे तेलाचा नमुना त्वरीत मे.अश्वमेघ लॅब, नाशिक यांचेकडून तपासणी करुन घेण्यात यावा व तपासणीअंती प्राप्त होणाऱ्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी. (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**(३)** यापुढे संस्थानसाठी खाद्यतेल व गावरान तुप खरेदी करण्यासाठी संस्थानने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार ज्या पुरवठाधारकांनी निविदा भरलेल्या आहेत, त्यांनी निविदेसोबत दिलेल्या सर्व नमुन्यांची मे.अश्वमेघ लॅब, नाशिक यांचेकडून प्रथमतः तपासणी करुन घ्यावी. सदर तपासणी अहवालानुसार ज्यांचे नमुने योग्य असतील तेच नमुने निवड समितीसमोर सादर करावेत.

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

**(४)** वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी मा.जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचेशी समक्ष संपर्क साधुन संस्थान रुग्णालयांमध्ये संपुर्ण वर्षभरात विविध आजारांसाठी जास्तीत जास्त प्रमाणात मोफत शिबीरांचे आयोजन कसे करता येईल, यादृष्टीने नियोजन करुन त्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे सादर करावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

**(५)** मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२६९४/ २०१२ व १२६९५/ २०१२, पी.आय.एल नं.१८/ २०११ मध्ये दि.२१.११.२०१२ रोजी केलेल्या हुकुमानुसार साईआश्रम भाग- १ व २ कडील सर्व कामे टेक्नीकल एक्स्पर्ट यांचेकडून पडताळणी करुन घ्यावयाची आहेत. मा.खंडपीठाचे हुकूमानुसार एक्सपर्टची नेमणूक श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे मा.अध्यक्ष यांनी करावी, असे सदरचे केसमध्ये संस्थानचे वतीने मा.खंडपीठात काम पहाणारे ॲड. चौकीदार यांनी सांगितले आहे.

त्यानुसार मा.खंडपीठाचे हुकुमानुसार सदर कारणासाठी टेक्नीकल एक्सपर्ट व फायनान्सीयल एक्सपर्ट यांची नेमणूक करावयाची असल्याने, सदर नेमणूक करण्याचे अधिकार मा.श्री.जयंत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना देण्यात आले. (कार्यवाही- विधी अधिकारी)

**(६)** संपुर्ण वर्षभरात साजरे होणारे श्रींचे श्रीरामनवमी, श्री गुरुपौर्णिमा व श्रीपुण्यतिथी उत्सव तसेच पारायण महोत्सव, त्याचबरोबर दिपावली, नाताळ व उन्हाळी सुट्टयांच्या कालावधीत श्रींच्या दर्शनासाठी शिर्डी येथे प्रचंड प्रमाणात भक्तांची गर्दी होते. अशा वेळी साईभक्तांच्या निवासव्यवस्थेच्या सोयीच्या दृष्टीने व साईभक्तांचे ऊन, वारा, पाऊस यापासुन संरक्षण होण्यासाठी तात्पुरत्या कालावधीसाठी आवश्यक त्या प्रमाणात कापडी मंडप उभारणी केली जाते व या कारणासाठी संस्थानला दरवर्षी लाखो रुपये खर्च करावा लागतो. हे विचारात घेता मागील पाच वर्षाच्या कालावधीत संस्थानचा मंडपावरील झालेला वर्षवार खर्चाचा सविस्तर तपशील तसेच कापडी मंडपाऐवजी पॉलिकार्बोनेट शीटचे शेड तयार करणेसाठीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करावा. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



वरील निर्णय क्र. ८८४ ते ९५२ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०७.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी